बृहन्मुंबई महानगरपालिका

ईमेल: stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोनन.: 022 24063001 / 02

लोकमान्य टिळक महानगर पालिका सर्व साधारण रुग्णालय व

लोकमान्य टिळक महानगर पालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई-२२


क्र. लोटिरु/34401/अधिष्ठाता, दि.09.02.2026

# जाहिरात

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. MGC/F/8767/ DATE- 29.11.2025 नुसार, लो.टि.म.स. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यामध्ये नमूद विभागामधील वरीष्ठ सल्लागार व कनिष्ठ सल्लागार अशी एकूण 06 पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात देऊन भरण्यात येत आहेत. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता / पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज लो.टि.म.स. रुग्णालयातील रोख विभाग, खोली नं. १५ येथे दिनांक 09.02.2026 ते 20.02.2026 सकाळी 11.00 ते दुपारी 03.30 पर्यंत कार्यालयीन वेळेत सशुल्क (रुपये 790/- + 18 % GST रू. 143/- एकूण रु. 933/-) उपलब्ध आहेत. अर्ज भरुन व त्याचे शुल्क भरल्याची पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स. रुग्णालयाच्या आवक जावक विभागात दिनांक 20.02.2026 रोजी दुपारी 04.00 वाजेपर्यंत सादर करावा.

**कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या विविध विभागातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे**

कंत्राट कालावधी: नेमणंकीच्या दिनांकापासून ते 31.03.2027 पर्यंत

| अ.क्र. | पदाचे नाव | ठोक मानधन (प्रतिमाह) | एकूण पदे |
|---|---|---|---|
| 1 | डी.एन.बी. टिचर ग्रेड-1 (वरिष्ठ सल्लागार) मज्जातंतूचिकित्साशास्त्र (Neurology) | रु. 2,00,000/- | 1 |
| 2 | डी.एन.बी. टिचर ग्रेड-1 (वरिष्ठ सल्लागार) मूत्रपिंडोपचारशास्त्र (Nephrology) | रु. 2,00,000/- | 1 |
| 3 | डी.एन.बी. टिचर ग्रेड-2 (कनिष्ठ सल्लागार) मूत्रपिंडोपचारशास्त्र (Nephrology) | रु. 1,50,000/- | 1 |
| 4 | डी.एन.बी. टिचर ग्रेड-1 (वरिष्ठ सल्लागार) सर्जिकल गॅस्ट्रोन्टरोलॉजी (Surgical Gastroenterology) | रु. 2,00,000/- | 1 |
| 5 | डी.एन.बी. टिचर ग्रेड-1 (वरिष्ठ सल्लागार) बालरोग रक्तविज्ञान (PAEDIATRIC HEMATO - ONCOLOGY) | रु. 2,00,000/- | 1 |
| 6 | डी.एन.बी. टिचर ग्रेड-2 (कनिष्ठ सल्लागार) बालरोग रक्तविज्ञान (PAEDIATRIC HEMATO - ONCOLOGY) | रु. 1,50,000/- | 1 |

**<u>शैक्षणिक अर्हता</u>**

1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील डिएम/डिएनबी पदबी प्राप्त केलेला असावा. सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक गुणपत्रिका व प्रमाणपत्रे सोबत जोडावीत,
2. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परिक्षा व तत्सम किमान 50 गुणांची प्रश्न पत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीव्दारे घेण्यात येणारी संगणकामधील सीसीसी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने /तिने महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण, मुंबईव्दारा संचालित एमएससीआयटी / जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र घेतलेले असणे आवश्यक आहे.
4. उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

**<u>अनुभवः</u>-** वरिष्ठ सल्लागार पदासाठी संबंधित विषयातील डीएम/डीएनबी अथवा तत्सम पदव्युत्तर पदवी नंतर संबधित विभागामध्ये कमीत कमी 8 वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव व कनिष्ठ सल्लागार पदासाठी संबंधित विषयातील डीएम/डीएनबी नंतर संबधित विभागामध्ये कमीत कमी 5 वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा.

**<u>वयाची अटः</u>-** सर्वसाधारण उमेदवाराकरीता वय 55 वर्षापेक्षा अधिक नसावे.

**<u>अर्जाचे शुल्कः</u>** रुपये 790/- + 18 % GST रु. 143/- एकूण रु. 933/- इतके आहे. सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**<u>मुलाखतीचे ठिकाण व वेळ</u>** अर्जामध्ये नमुद ई-मेल व भ्रमणध्वनी क्रमांकावर (Mobile No.) कळविण्यात येईल.

**<u>निवडीचे निकष व कार्यपध्दती:</u>** सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीमधून प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन निवड यादी तयार करण्यात येईल.

**<u>सर्वसाधारण अटी</u>**

1. सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्वावर असून नेमणूकीच्या दिनांक पासून ते दिनांक 31.03.2027 मंजुरी कालावधीकरीता (प्रत्येक 45 दिवसापूर्वी 1 दिवसाचा खंड देऊन) किंवा नियमित तत्वावरील कर्मचा-यांच्या नेमणुकीच्या दिनांकापर्यत, जे अगोदर घडेल अशा स्वरुपात करण्यात येईल.
2. कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक आवश्यक नसल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार प्रशासनाकडे असतील.
3. नेमणूक केलेल्या उमेदवारास कंत्राटी तत्वावरील नेमणूक नियमित स्वरुपात करण्यासाठी कोणताही दबाव किंवा न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
4. पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराने आपला घरचा पत्ता पिन कोडसहित अर्जात पूर्ण भरावा. तसेच संपर्क साधण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी नमूद करावेत.
5. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या ठोक मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

6. सदर नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी तत्त्वावर असल्याने येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 लागू होणार नाही.
7. उमेदवार विवाहित असल्यास नावात बदल असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे ,तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
8. उमेदवाराने पदविका / पदवी परिक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परिक्षा किती प्रयत्नांत उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास /शिक्षा झालेली असल्यास उमेदवारने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
10. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती /प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
11. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ‘ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
12. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रीया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना आहेत.
13. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
14. निवड झालेल्या उमेदवारास रुपये 500/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
15. निवड झालेल्या उमेदवाराविरध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
16. कंत्राटी तत्वावर नियुक्त कर्मचा-यांना बायोमेट्रीक उपस्थिती नोंदविणे बंधनकारक आहे.
17. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
18. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता उमेदवाराची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता (लो.टि.रु.) यांच्याकडे राहतील.
19. कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

विशेष सूचनाः

1. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेच्या छायांकित प्रती व अलीकडेच काढलेले छायाचित्र अर्जावर चिटकवुन विहित नमुन्यातील सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज लोटिमस रुग्णालयाच्या आवक जावक विभागात **दिनांक 09.02.2026 ते 20.02.2026** पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.
2. अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती अर्जासोबत जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.
3. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले /प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
4. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोद घ्यावी.

सही/- दि. 06.02.2026.

अधिष्ठाता

लो.टि.म.स.रूग्णालय, शीव